दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र मंगळवार दि.५ नोव्हेंबर २०२४ आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ वर्ष २ रे अंक -७५ पाने ४ किंमत ४ रुपये

## देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला फसवले

**पुणे (वृत्तसंस्था)**–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी ७० हजार कोटींच्या कथित सिंचन घोटाळ्यावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. देवेंद्र फडणवीस यांनी ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप असणाऱ्या व्यक्तीला त्याच्या चौकशीची फाईल दाखवलीच कशी? असा खडा सवाल त्यांनी यासंबंधी उपस्थित केले आहे.सुप्रिया सुळे सोमवारी कोल्हापूरच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात त्यांनी स्थानिक पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी सिंचन घोटाळ्याच्या खुल्या चौकशीची फाईल अजित पवारांना दाखवण्याच्या मुद्यावरून देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. त्या म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस यांनी ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांनाच त्यांच्या खुल्या चौकशीची फाईल व त्यावरील स्वाक्षरी कशी काय दाखवली? असे करून त्यांनी राज्यातील जनतेची फसवणूक केली. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे. याचे उत्तर त्यांना द्यावेच लागेल.अजित पवार यांची नुकतीच सांगली येथे एक सभा झाली होती. या सभेत बोलताना त्यांनी सिंचन घोटाळ्यात आर. आर. पाटील यांनी आपला केसाने गळा कापल्याचा गंभीर आरोप केला होता.

# मनोज जरांगेंची निवडणुकीतून माघार;उमेदवारी नाही,पाडा

**छ. संभाजीनगर | प्रा संजय तुपे**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल दि.३ रोजी कोण-कोणत्या मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवणार, याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली होती. तसेच, कोणत्या जागेवरील उमेदवार पाडण्याचे याबाबतही सांगितले होते. मात्र, आता मनोज जरांगे पाटील यांनी मोठा निर्णय घेत विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे.मित्रपक्षाची यादी आलेली नाही. त्यामुळे एका जातीवर निवडणूक लढणे आणि जिंकणे शक्य नाही. त्यामुळे समाज बांधवांनी आपापले अर्ज काढून घ्यावेत.

उमेदवार द्यायचा नाही, आता कोणाला पाडायचे ते पाडा आणि कोणाला आणायचे ते आणा, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी (दि.४) केले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी दिवसभरात विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांची बैठक घेतली.मराठा, मुस्लिम आणि दलित अशी त्रिसूत्री घेत या बैठकीत २५ मतदार संघावर चर्चा करण्यात आली. रात्री १४ मतदार संघ ठरवून मराठा समाजाचे उमेदवार अंतिम करायचे होते. इतर ठिकाणी मुस्लिम, दलित मित्रपक्षातील उमदेवार देण्यावर चर्चा करण्यात आली. सोमवारी पहाटे ५ वाजेपर्यंत कोणत्या जागांवर निवडणूक लढवायची, एका जातीवर निवडणूक लढायची का यावर चर्चा करण्यात आली. परंतु, मित्रपक्षाची यादी सकाळी ९ वाजले तरी आलेली नाही.यादी आली नसली तरी ते मित्रपक्ष आपलेच आहेत. त्यामुळे जरांगे पाटील यांनी समाजाच्या जिवावर निवडणूक लढविता येत नाही.

महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो कोणी आमच्या कामाचे नाही. त्यामुळे कोणाला पाडा आणि कोणाला आणा म्हणण्यात अर्थ नाही. तुमच्या मतदार संघात तुम्हाला ज्याला मदत करायची त्याच्याकडून 'मी तुमच्या मागण्यांशी सहमत आहे', असे लिहून घ्या, असे आवाहन केले. आम्ही निवडणुकीत असलो तरी समोरच्याचा खेळ खलास आणि नसलो तरी खेळ खलास, असे म्हणत विरोधकांना जरांगे पाटील यांनी इशारा दिला. तसेच आता गणिमी काव्याने समाजाची ताकद दाखवू, असेही ते म्हणाले.मी आणि माझे आंदोलन, मी राजकारणात नाही. मी आणि माझे आंदोलन आहे. कोणी मला खवळले तर मी त्यांचा खेळ खल्लास करेन. लोकसभा पॅटर्ननुसार आम्ही आमची भूमिका घेणार आहोत. कोणत्याही अपक्षाला पाठिंबा नाही सर्व उमेदवारांनी आपले अर्ज मागे घ्यावेत. आपण कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा अपक्षाला पाठिंबा दिलेला नाही. राखीव असो किंवा इतर जागा असोत तेथे आमचा पाठींबा अद्याप तरी जाहीर केलेला नाही, असेही जरांगे पाटील म्हणाले.



## आज ज्यांनी मला मदत केली त्यांनाभविष्यात मी कधीच विसरणार नाही–बदामराव पंडित

### सिरसदेवीत राष्ट्रवादी व भाजपला पुन्हा खिंडार

**गेवराई | प्रतिनिधी**

गेल्या ४० वर्षापासून निस्वार्थीपणे सर्व जाती धर्मातील गोरगरिबांची मी प्रामाणिकपणे सेवा केली आहे. येईल त्याचे काम केले आहे, आणि या पुढच्या काळातही शेवटच्या श्वासापर्यंत ही सेवा मी करतच राहणार आहे. सध्या विधानसभेची निवडणूक सुरू असून आज मला ज्यांनी मदत केली त्यांना भविष्यात मी कधीच विसरणार नाही असा ठाम विश्वास महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त केला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना उमेदवारी जाहीर होताच अनेक गावचे कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपला सोडचिठ्ठी देऊन शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करत आहेत. दि १ नोव्हेंबर २०२४ दिवाळीच्या दिवशी सिरसदेवी येथील असंख्य मुस्लिम समाज बांधवांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला असून, बदामराव पंडित यांना आमदार करण्यासाठी तालुक्यातल्या प्रत्येक गावात जाऊन, घराघरातील प्रत्येक मतदारांच्या भेटी घेण्याचा निर्धार या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. यात शेख सद्दाम, वाहेद भाई, मुसा कुरेशी, शेख चांद खाजाभाई, शेख आय्यूम, शेख फरदीन, शेख दाऊद, शेख रईस, शेख चांद, शेख सोहेल, शेख आयुब, शेख अमर, शेख जावेद, शेख अली, शेख नय्युम, शेख आरेफ, शेख आसिफ, शेख अमजद, शेख सादेक यांच्यासह असंख्य युवा कार्यकर्त्यांचा समावेश आहे. बीड जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती तथा शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित यांनी सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले. पुढे बोलताना बदामराव पंडित म्हणाली की गेवराई मतदार संघातील मतदार हे स्वाभिमानी आहेत. ते कोणाच्या आर्थिक आमिषाला, कोणाच्या दबावाला आणि कोणाच्या दादागिरीला बळी पडणार नाहीत याचा मला विश्वास आहे. गोरगरिबांच्या अडचणी सोडण्यासाठी मी भक्कमपणे उभा आहे. विधानसभा निवडणुकीत गोरगरिबांना अडचणीत आणणाऱ्या विरोधकांना त्यांची जागा दाखवण्यासाठी आज माझ्या खांद्याला खांदा लावून जे जे लोक मला मदत करत आहेत त्यांना आयुष्यात मी कधीही विसरणार नाही. असा विश्वास बदामराव पंडित यांनी व्यक्त केला. यावेळी विठ्ठलराव रूचके, शेख ताहेरभाई आदींसह शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनसेवा फाउंडेशन यांची दिवाळी निमित्त अनोखी भेट

**पालघर | सौरभ कामडी**

मोखाडा जन सेवा फाउंडेशन भारत यांच्या मार्फत दिवाळी निमित्त जांभूळवाडी,जव्हार येथे गरीब गरजू लोकांना कपडे वाटप करण्यात आले यावेळी जनसेवा फाउंडेशन चे अध्यक्ष सचिन पाटील,संपर्क प्रमुख राजेश भालींगे व पदाधिकारी उपस्थित होते.दिवाळी ही समाजाच्या प्रत्येक घटकात खेड्या पाड्यातील लोकांन सोबत साजरी करावी या हेतूने जनसेवा फाउंडेशन यांनी एक पाऊल उचलून सर्व सामान्य जनतेच्या सेवे साठी व त्यांना एक छोटीसी मदत म्हणून गाव पाड्यात जाऊन समाज बांधवांना दिवाळी निमित्त कपड्याचे वाटप करण्यात आले यावेळी लहान मुलांचे कपडे ते मोठ्या माणसाचे स्त्री पुरुषाचे कपडे वाटप करण्यात आले यावेळी जमलेल्या लोकांन मध्ये त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होतो यावेळी जमलेल्या लोकांनी जनसेवा फाउंडेशन चे आभार मानले व अशीच मदत आपल्या हातून व्हावी व आपल्या संस्थेचे नाव खूप मोठे व्हावे



अश्या शुभेच्छा दिल्या.यावेळी जनसेवा फाउंडेशन भारत च्या पदाधिकाऱ्यांनी ही उपस्थित जनतेचे आभार मानले व ही एक छोटीसी भेट असल्याने यापुढे ही आपणास मोठ्या प्रमाणात भेट देऊन आपली दिवाळी साजरी करू असे जनसेवा फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पदी प्रा संजय तुपे

**छ. संभाजीनगर | प्रतिनिधी**

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या पदाधिऱ्यांची ऑनलाईन बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश व सर्व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पदी प्रा संजय तुपे यांची नियुक्ती केली.याप्रसंगी राज्यात कुठेही पत्रकारांवर अन्याय झाल्यास हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशन पत्रकारांच्या समस्यांवर आवाज उठवणार असल्याचे प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी सांगितले.

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पदी प्रा संजय तुपे यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र अध्यक्ष असलम कुरेशी, प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, प्रदेश महासचिव विनोद भोकरे, महाराष्ट्र प्रदेश सचिव जावेद पठाण (भोकरदन), महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रणजितसिंह ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रियाज शेख, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद महेबुब, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, महाराष्ट्र प्रदेश सहसचिव शेख शकिल (जळगांव), मराठवाडा प्रवक्ता रहिम पठाण, विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद, महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी अमजद पठाण, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य राम कोडवते, उमेश गोधने, महेश भैराम, धनंजय तरारे, विदर्भ विभागीय अध्यक्ष मो. तारेक शेख, नागपूर जिल्हा अध्यक्ष देवेंद्र मुरकुटे, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष मिर्झा अक्रम बेग, अमरावती जिल्हा अध्यक्ष मुबिन शेख, गोंदीया जिल्हा अध्यक्ष गौरव कुमार, वर्धा जिल्हा अध्यक्ष तनविर अशरफ, नांदेड जिल्हा अध्यक्ष सुनिल शेळके, अविनाश मेश्राम, आरती प्रजापती, इलियास बेग, गोपाल इंगोले आदिंनी त्यांचे अभिनंदन केले.

## आ.नमिता मुंदडांमुळे मतदार संघातील रस्ते होताहेत चकाचक;दर्जेदार रस्त्यांमुळे दळणवळण झाले सुकर

**केज | सचिन भालेराव**

केज मतदार संघात मागील काही महिन्यांमध्ये रस्त्यांची कामे गतीने व दर्जेदार पद्धतीने होत असल्यामुळे रस्त्यांमुळे दळणवळणाच्या साधनांत वाढ झाली आहे. ग्रामीण, दुर्गम भाग तालुक्यांना जोडले गेल्याने सर्वसामान्यांना नोकरी-व्यवसाय करणे सुलभ झाले आहे. बाजारपेठा जवळ असल्याने प्रवासाचा वेळ कमी झाला आहे. आर्थिक वृद्धीमुळे जीवनमान उंचावले आहे. चांगल्या रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमुळे मालमत्तेचे मूल्यही वाढले आहे. याचे सर्व श्रेय केज विधानसभेचे आमदार सो नमिता अक्षय मुंदडा यांनाच जाते असे म्हणले तर ते अतिशोक्ती ठरणार नाही



तस पाहिला तर केज तालुका हा क्षेत्रफळाने आणि लोकसंख्येने मोठा आहे.त्याबरोबरच केज विधानसभा ही केज व अंबाजोगाई या दोन तालुक्यातील लोकसंख्या एकत्र करून तयार केलेला मतदार संघ आहे.केज तालुक्यात एकूण २२४ गावे असून या गावांना जोडण्यासाठी व तेथील दळणवळण वाढवण्यासाठी तसेच या गावांचा रस्त्यांचा व इतर विकास करण्यासाठी नामदार नमिता ताई मुंदडा यांनी पाठपुरावा करायला सुरुवात केली.व रस्त्यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी आणून गावचा तालुक्याचा विकास केला. यामुळे केज विधानसभेतील गावे एकमेकांना जोडली गेली. याच विकासकामानं मुळे आमदार नमिता मुंदडा यांचे सर्वस्तरातून अभिनंदन तर होतेच आहे. तर खेड्यापाड्यावाड्या वस्तीतून एकच सुर निघत आहे कि पुन्हा आमदार नमिता मुंदडा यांनाच विधानसभेत पाठवायचे आहे.

## बदामरावजी आबा पंडित यांना बहुमतांने विजयी करा समद भाई शेख ताडसोन्ना

**बीड | प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघात पंडित विरुद्ध पंडित आशी लढत विधानसभा निवडणुकीत होणार आसल्याने या निवडणुकिकडे संपूर्ण जिल्ह्यातील लक्ष लागले आहे.विशेष म्हणजे गेवराई मतदारसंघातील गोरगरीब,सर्व समान्य जनतेच्या हक्काच्या कामासाठी लढणारा नेता म्हणजे बदामरावजी आबा पंडित यांच्याकडे पाहिले जाते.

कारण ते गेवराई मतदार संघातील जनतेच्या मनातील खरे नेते आहेत.पाच वर्षांच्या काळात कधीही मतदारसंघात तोंड न दाखवणारे नेते आज मतदारसंघात फिरून मतदारांशी संवाद साधत आहेत. बदामरावजी आबा पंडित हे २४ तास मतदारसंघातील गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी दिवस: रात्रझटणारे एकमेव नेते आहेत. बदामरावजी आबा पंडित यांना आमदार



करण्यासाठी प्रयत्नशील मेहनत हाती घेणार आहोत. आणी या मेहनतीतुन बदामरावजी आबा पंडित यांना प्रचंड बहुमतांने विजयी करणार आसल्याचे युधाजित दादा पंडित यांचे कट्टर समर्थक समद भाई शेख यांनी सांगितले आहे.

## साखर कारखाने गळीत हंगाम शुभारंभ परवाना दिनांका मध्ये बदल होण्याची शक्यता

### कारखानदार आणि मुकादम यांनी ऊस तोडणी कामगारांना पाठवण्याची घाई करू नये–माजी मंत्री सुरेश धस

**आष्टी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुरू करण्याच्या क्रशिंग लायसन्स तारखे मध्ये बदल होण्याची शक्यता असल्याची आपली माहिती असून अधिकृत घोषणा लवकरच होणार असल्यामुळे कारखानदार आणि मुकादम यांनी ऊस तोडणी कामगारांना कारखान्यांकडे पाठवण्याची घाई करू नये असे आवाहन माजी मंत्री सुरेश धस यांनी केले आहे समाज माध्यम प्रतिनिधीशी बोलताना ते पुढे म्हणाले की दिनांक १५ ऑक्टोबर या दिवशी गळीत हंगाम सुरू करणे बाबतचे कृषी लायसन्स ची तारीख नियोजित होती परंतु महाराष्ट्र राज्यातील धुळे नंदुरबार छत्रपती संभाजी नगर जालना परभणी नांदेड आणि विशेषत: बीड जिल्ह्यातील बहुतांश ऊस तोडणी कामगारांचा मतदानाचा मूलभूत अधिकार असल्यामुळे ते मतदानाचे पवित्र कार्य असून वंचित राहण्याची शक्यता होती त्यामुळे मतदानाची तारीख असलेल्या २०



ऑक्टोबर नंतर साखर कारखान्यांनी गळीत हंगाम सुरू करावा मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री सहकार मंत्री आणि आमदार पंकजाताई साहेब मुंडे यांना आपण याबाबत अवगत केले असून त्यांनी याबाबत सकारात्मक विचार केला असून याबाबत तात्काळ निर्णय घेतला जाणार आहे त्यामुळे साखर कारखाना व्यवस्थापन आणि ऊस तोडणी कामगार मुकादम वाहतूकदार यांनी ऊस तोडणी कामगारांना साखर कारखान्याकडे पाठवण्याची घाई करू नये असे विनम्र आवाहन आपण करत आहोत असे त्यांनी शेवटी म्हटले आहे.

संपादकीय

# तुझे आहे तुजपाशी...



आनंद प्रत्येकाच्या मनात सहज प्रवृत्तीप्रमाणे असतो. कोणाला अगदी क्षुल्लक गोष्टीतही खूप आनंद मिळतो, तर कित्येक जणांना मोठा आनंदही दाखवता येत नाही. सुख मानणे व आनंद घेणं-देणं हे माणसाची नैसर्गिक वृत्ती असते. मात्र हे खरं की, आनंद मनाला रिचार्ज करणारे विनामूल्य टॉनिक आहे. आजकाल धकाधकीच्या जीवनात आनंदाचे क्षण समोर दिसले तरी उपभोगाची मानसिकताच नाही. आपण जाणीवपूर्वक आनंदाचे येणारे क्षण साजरे करायचे आणि मनाचा, शरीराचा उत्साह वाढवायचा. जीवनातील ताण कधी चुकत नाहीत, आणि चुकणारही नाहीत. कारण सुख-दुःख, आनंद -शोक हे जुळे भाऊ आहेत. सुखाचा आनंद मनात जपायचा. दुःखाचा मार बाऊ न करता सोसायचा. आपला जीवनप्रवास आनंदमय करण्यासाठी हे करणं गरजेचं आहे. सकाळी उठून नुसतं निसर्गाकडे पाहिलं की कळतं की, कालचं सुकलेलं फुल जाऊन उद्या उमलणारी कळी वाऱ्यावर डोलत असते. रंगीबेरंगी फुलपाखरे नाचत असतात, सप्तरंगांची निसर्गाची उधळण चालू असते. कशातही खंड पडत नसतो. सकाळी देवालयातून येणारा भजनाचा आवाज, देवापुढे लावलेल्या सुवासिक उदबत्तीचा सुगंध, घरात आरतीच्या वेळेला होणारा घंटानाद आणि नातवंडांची गडबड, मुलांची गडबड मनाला प्रसन्न करून टाकते. डोळे उघडे ठेवून जगावे. आपले भारतीय सण, त्याकरिता केली जाणारी तयारी, सणावारांचा जेवणावळींचा कार्यक्रम मन उत्साही करतो, मनाला चैतन्य देतो. रोजच्या रुटीनमधील बदलही आनंददायी असतो. सामुदायिक कामात, नामस्मरणात, मदत करण्यात, दान सत्पात्री देण्यातला आनंद घ्यावा.कोणालाही बदलण्यापेक्षा जमले तर जुळवून घ्यावे, नाहीतर आपला मार्ग आखावा. मन सतत गुंतले की बारीक सारीक गोष्टींत मोठा आनंद मिळतो. आपण नेहमी चांगल्या विचाराने दुसऱ्याकडे बघितलं की मनातली जळमटं साफ होतात व आनंदाची नवनवीन दिशा सापडते. आनंद घ्यावा, आनंद द्यावा. जगा, जगू द्या या तत्त्वावर आयुष्य रेखावे. आयुष्य सोपं नसतं आणि नव्हतं. अवघड असलं तरी ते कठीणही नसते. आयुष्य हे नेहमी चढ-उतारांचे असते, खाचखळग्यांचं असतं. मनाचं आरोग्य चांगलं राखलं की तनाचं आरोग्य चांगलं बनतं. असं म्हणतात, मन चंगा तो कठौतीमें गंगा... 'आनंदाचे डोही आनंद तरंग'. खडतर जीवन प्रवास करायचा तर आहेच, पण आनंद या शब्दाशी आपण शरीर व मनाने कायम जवळीक ठेवायची आणि मनाला तशी शिकवण द्यायची. संसारात कित्येक क्षण सुखाचे असतात, पण आपल्या स्वमग्नतेत आणि या आभासी जगात आपण नकळत इतके गुरुफटले गेलोत की हे आनंद क्षण उपभोगायचे आपण विसरूनच गेलो. मैत्रीचे क्षण, बालपणाचे क्षण, शाळा, कॉलेजचे क्षण परत परत आठवावेत, जुन्या लोकांना भेटावं, आठवणी उजळाव्यात आणि मनातला आनंद द्विगुणीत करावा. रोज एका मळलेल्या वाटेने न जाता निरनिराळ्या वाटा चोखाळा, मग पहा आयुष्यातला तोचतोचपणा, एकसुरीपणा हरवून नावीन्य कसं आनंद आणतं. हे जे नावीन्य आहे, तोच जीवनानंद आहे. निसर्गात जीवनानंद आजूबाजूलाही आहे. गुलाबाच्या रंगात आहे, निसर्गाच्या हिरवाईत आहे, नातवंडांच्या साखर स्पर्शात, देवाच्या सान्निध्यातही तो आहे. चाफ्याच्या मोहक वासात आहे, जोडीदाराच्या सहवासात आहे, फार काय मनासारख्या खरेदीतही जीवनानंद आहे. आपण मनाने आणि शरीराने तो उपभोगायचा हे महत्त्वाचं आहे. सारासार विचार दुःखाची संकटांची तीव्रता कमी करतात व सकारात्मकता वाढीला लागते. आपल्याला वयाच्या कोणत्याही टप्प्यावर एकटेपणा नको असतो. जबाबदाऱ्या नीट पार पाडायच्या. वय झालं की सारं आनंदाने पुढच्या पिढीकडे सोपवायचे. मनापासून अलिप्त होताना हा निग्रह करावा लागतो.

# आपला रानटी व राक्षसी देश

आई-वडिलांना सोडून प्राथमिक शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या दुसरीतल्या-नऊ वर्षांच्या मुलग्याचा शाळेच्या संचालकांनी आणि इतरांनी शाळेच्या भरभराटीसाठी 'बळी' द्यावा; ही उत्तर प्रदेशातील घटना अंगावर काटा आणणारी आहे. शाळा जोरात चालावी आणि आपली कर्जे फिटावीत, यासाठी आपल्याच शाळेतील लहानग्याचा गळा आवळून जीव घ्यावा; असे शाळाचालकांना वाटूच कसे शकते? उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्यात ही खासगी शाळा चालविणाऱ्या संचालकाचा बाप व इतरांना या मुलाला बळी म्हणून जिवंतच गाडायचे होते. त्यासाठी त्याला झोपेतच वसतिगृहातून उचलण्यात आले. मात्र, तो जागा झाला आणि रडू लागला. तेव्हा या संचालक व इतरांनी त्याचा नाक व गळा दाबून खून करून टाकला आणि आई-वडिलांना कळविले की तुमच्या मुलाला ताप आला आहे. हा गुन्हा घडल्यानंतर तो उजेडात येण्यास आणि कारवाई होण्यास जो वेळ लागला; तो पाहता हे प्रकरण दडपण्याचा निश्चितच प्रयत्न झालेला दिसतो. या मुलाचे शव घेऊन दवाखान्यांमध्ये जाणाऱ्या शाळाचालकांच्या गाडीवर एका राजकीय पक्षाचा झेंडा होता, असे साक्षीदार सांगत आहेत. हे खरे असेल तर उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची 'गुन्हेगारांना धडा शिकविण्याची आणि तात्काळ न्याय देण्याची' भाषा पोकळ व बाष्कळ म्हणायला हवी. आत्ता पाच जणांना अटक झाली असली तरी असा हा 'काळ्या जादू'चा पहिलाच प्रकार नसणार. या शाळेच्या आवारातील विहिरीत जारण-मारण किंवा चेटूक करण्यासाठी लागणारी सामग्री सापडली आहे. तसेच, या मारेकऱ्यांच्या तावडीतून सुटून घरी पळून गेलेला एक छोटा शाळकरी मुलगा 'अंकल ने मेरा गला दबाया था...' असे कॅमेऱ्यासमोर सांगतोच आहे.



या मृत मुलावर ठार करण्यापूर्वी अत्याचार झाले आहेत का, हे तपासात स्पष्ट होईल. पण एकीकडे महत्त्वाकांक्षी शैक्षणिक धोरणे लागू होणाऱ्या आपल्या देशात काय लायकीचे लोक शाळा आणि शैक्षणिक संस्था चालवत आहेत, हे यातून स्पष्ट होते. महाराष्ट्रातील शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, आश्रमशाळा, वसतिगृहे यांचीही स्थिती फारशी बरी नाहीच. अर्थात, आपल्यापुढे उत्तर प्रदेशाचाच आदर्श असल्याने त्यात आश्चर्य नाही. गेल्याच वर्षी नाशिक जिल्ह्यात आश्रम-शाळकरी मुलांचा अपमृत्यू झाला होता. अर्थातच, हाथरसमधील हत्येला अंधश्रद्धेच्या विळख्याची जी काळी बाजू आहे, ती भयानक आहे आणि या क्रौर्याची तुलना कशाशीही करणे शक्य नाही. 'आता कुठे काय अंधश्रद्धा..?' असे म्हणण्याची शहरांमध्ये साधारण फॅशन आहे आणि त्यामागे अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची अवहेलना करण्याचा सूर असतो. ते त्यांचे काम करीतच आहेत. मात्र, धर्माचा, धर्माच्या आचरणाचा आणि धार्मिक समजुती तसेच धर्मश्रद्धांचा प्रवाह स्वच्छ झाल्याशिवाय हे मध्ययुगाला लाजवतील असे गुन्हे थांबणार नाहीत. याची प्रामुख्याने जबाबदारी 'आम्ही हिंदू धर्माचे किंवा धर्मासाठी काम करतो..' असे सांगणाऱ्या सर्व पक्ष, संस्था, संघटना, पंथ, उपपंथ, धर्माचार्य, कीर्तनकार, प्रवचनकार, संत-महंत, बाबा-बुवांची आहे. 'असे वर्तन हा खरा धर्म नाही..' असे या सर्वांनी वारंवार उच्चरवात, सर्वतोपरी सांगितल्याशिवाय असे प्रकार कमी होणार नाहीत. सर्वच धर्मांमधील अशा प्रकारांच्या विरोधात खरे तर राष्ट्रव्यापी मोहीमच उघडायला हवी. तेच खरे धर्मकार्य असेल. मात्र, राजकीय नेतेच नव्या घरात जाताना किंवा जुनी घरे सोडताना अंधश्रद्धा पसरविणारे काळे-कभिन्न विधी करत असतील तर काय बोलणार?उत्तर प्रदेश सरकारला या ओबीसी वर्गातील, वडील अपंग असणाऱ्या निष्पाप मुलाच्या खुनाची तड लावायची असेल तर तातडीने विशेष न्यायालय स्थापावे. पाचही आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. शाळेवर कारवाई करू, असे आता सांगितले जात आहे. मात्र, या शाळा व वसतिगृहाला कायमचे टाळे लावायला हवे. सर्वच राज्य सरकारांनी आपण कुणाला शाळा, आश्रमशाळा, कॉलेजे.. देत आहोत, याचेही जरा आत्मपरीक्षण करावे. हाथरसमधील ही शाळा चालविणाऱ्याचा बाप अशी काळी जादू आधीपासूनच करत आहे. मग या शाळेतील इतरही मुलांवर या आधी असे अघोरी प्रयोग झाले नसतील, कशावरून? त्या दृष्टीने सखोल चौकशी व्हायला हवी. अशा गुन्ह्यांमध्ये 'हा आपल्या पक्षातला व हा विरोधी पक्षातला', असे निकष लागत असतील असल्या पक्षपाती, धृतराष्ट्री सरकारांपेक्षा मोगलाई परवडली. ज्या मुलाचे पालक 'याला आयएएस, आयपीएस बनवू..' अशी स्वप्ने पाहात होते, त्यासाठी त्याला दूर वसतिगृहात ठेवत होते; त्यांच्या हातात शिक्षण क्षेत्रातील या राक्षसांनी अंधश्रद्धेपायी मारून टाकलेल्या मुलाचा निष्प्राण देह ठेवला आहे. काळीज चुरगळून टाकणारी याहून दुसरी मोठी शोकांतिका कोणती असू शकेल? हाही आजचा भारत आहे आणि तो मन पुरते काळवंडून टाकणारा आहे..

# गुंतवणूकदारांना झालंय काय?

मारुतीच्या शेपटीप्रमाणे 'वाढता वाढता वाढे' असा मुंबई शेअर बाजार निर्देशांक आणि निफ्टी फिफ्टी निर्देशांक बघून भारतीय सामान्य गुंतवणूकदार कानात वारं शिरलेल्या बैलासारखे उधळले आहेत की काय, अशी शंका येऊ लागली आहे. आजवर कधीच अशी कृती छोट्या सामान्य गुंतवणूकदारांकडून अनुभवास आली नव्हती. खरोखरच एवढे छोटे सामान्य गुंतवणूकदार काही महिन्यांत आर्थिक साक्षर होऊन शेअर्स व्यवहारात सक्षमपणे आणि स्वतंत्रपणे एवढ्या मोठ्या रकमेचे व्यवहार करू लागलेत की त्यांना वाढणाऱ्या निर्देशांकांची भूल घालून अवास्तव नफ्याची आमिषे दाखवून शेअर बाजारात 'बकरे' बनवले गेले आहेत? हे आणि असे अनेक प्रश्न फेर धरून उभे आहेत. गेल्या दहा वर्षांतील लोकांचा विविध गुंतवणूक माध्यमांत बचत करण्याकडील कल लक्षात घेता खूपच मोठा बदल झाल्याचे आढळते. मागील चार आर्थिक वर्षांत सर्वसामान्य लोकांनी बँक ठेवी मोडून शेअर्स आणि म्युच्युअल फंड्सकडे मोठ्या प्रमाणात आपली बचत वळवली. बँकामधील पुनरावर्ती खाती-रिकरिंग डिपॉझिट बंद करून म्युच्युअल फंडांच्या नियोजनबद्ध गुंतवणूक योजनांना -एसआयपींना आपलेसे केले. परिणामी बँकांच्या ठेवी आणि कर्जांमधील तफावत वाढत गेली. त्यामुळे आता बँकांना रोखे विक्रीतून निधी उभरावा लागत आहे. विद्यमान आर्थिक वर्षांत किमान एक कोटी वीस हजार रुपयांचा निधी या रोखे विक्रीतून उभा केला जाणार आहे. विक्रीस येणाऱ्या रोख्यांपैकी सुमारे ८५ टक्के हिस्सा सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा असणार आहे.

ब्ल्यूमबर्ग आणि एसओआयसीच्या सर्वेक्षणांनुसार २०१४मध्ये सर्वसामान्य लोकांची सर्वाधिक बचत बँक ठेवींत असायची. हे प्रमाण एकूण बचतीच्या ३३ टक्के होते, तर बचत खात्यांत २१ टक्के आणि चालू खात्यात ४ टक्के असायची. आयुर्विमा, पेन्शन योजना आणि म्युच्युअल फंडांत अनुक्रमे २३ टक्के, ७ टक्के, आणि ५ टक्के असून शेअर्समध्ये ७ टक्के गुंतवलेले होते, परंतु आता २०२४मध्ये ही सर्व परिमाणे बदलली आहेत. एकूण बचतीच्या २३ टक्के बँक ठेवीत, १७ टक्के बचत खात्यांत आणि चालू खात्यात अवघे २ टक्के आहेत. आयुर्विमा, पेन्शन योजना आणि म्युच्युअल फंडांत अनुक्रमे २१ टक्के, १२ टक्के, आणि ११ टक्के असून शेअर्स मध्ये १२ टक्के गुंतवलेले आहेत. रोखेसंग्रह व्यवस्थापन सेवेत (झचड) आणि पर्यायी गुंतवणूक फंडांत (-खऋ) दोन टक्के आहेत. विविध गुंतवणूक



माध्यमांत गुंतवणूक करताना वैविध्यपूर्ण -ऊळ-ीशीीळषळशव असली पाहिजे, हे जरी खरे असले तरीही अधिकाधिक जोखीमयुक्त साधनांकडे गुंतवणूकदारांचा झुकलेला कल वेगळेच चित्र पुढ्यात आणतो. हे चित्र निश्चितच भयावह असून त्यांना आर्थिक विवंचनेकडे नेणारे आहे. कोविड काळात घरी बसून काम करताना पगाराबरोबरच किंवा नोकरकपातीचा बळी म्हणून रोजच्या रोज अतिरिक्त उत्पन्न मिळवता येईल, या भ्रमात किंवा आशेने शेअर बाजारात आश्वासक टाकलेले पाऊल नंतरच्या दोन वर्षांत कसे घसरत गेले ते कळलेच नाही. वॉरेन बफे यांची तत्त्वे एका दृष्टिक्षेपात शिकून नियमित वेतनाव्यतिरिक्त चार पैसे (की रुपये ?) अधिक मिळविण्यासाठी शेअर बाजारात काहीही करण्यापर्यंत गेलेली मजल डोळे विस्फारणारी आहे. वायदे बाजारातील (निष्पणक डेरिव्हेटिव्ज) म्हणजेच फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये गेल्या दोन आर्थिक वर्षांत सामान्य छोट्या गुंतवणूकदारांनी केलेले व्यवहार बघून सेबीलाही या व्यवहारांची दखल घ्यावी लागली. आर्थिक वर्ष २०२१-२०२२मध्ये फ्युचर्स आणि ऑप्शन्स मध्ये व्यवहार करणाऱ्या किरकोळ गुंतवणूकदारांची संख्या ५१ लाख होती, ती २०२३-२०२४ मध्ये ९६ लाखांवर पोहोचली होती. आर्थिक वर्ष २०२१-२२च्या अहवालात सेबीने स्पष्ट केले आहे की, फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये गुंतवणूक केलेल्यांपैकी ८९ टक्के गुंतवणूकदारांना तोटा झाला होता. २०२१ ते २०२४ या तीन आर्थिक वर्षांच्या फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये सुमारे एक कोटी दहा लाख गुंतवणूकदारांपैकी ९३ टक्के गुंतवणूकदारांना सरासरी प्रत्येकी किमान दोन लाख रुपयांचा तोटा स्वीकारावा लागला आहे. सर्व गुंतवणूकदारांना झालेल्या तोट्याची एकूण रक्कम एक लाख ८० हजार कोटी रुपयांची आहे. मागील तीन आर्थिक वर्षांत फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये केवळ एक टक्काच गुंतवणूकदारांना एक लाख रुपयांहून अधिक रकमेचा नफा झाला आहे. हे सर्व व्यवहार बघताना एक बाब प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये वैयक्तिक गुंतवणूकदारांनी देशी संस्थात्मक गुंतवणूकदार आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार यांच्या तुलनेत सपाटून मार खाल्ला आहे. देशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ३३ हजार कोटी रुपयांचा तर परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी २८ हजार कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. याच आर्थिक वर्षात वैयक्तिक गुंतवणूकदारांनी ६१ हजार कोटी रुपयांचा तोटा स्वीकारावा लागला आहे. याच व्यवहारांमुळे मागील तीन आर्थिक वर्षांत वैयक्तिक गुंतवणूकदारांकडून ५० हजार कोटी रुपये व्यवहार शुल्क प्राप्त झाले. त्यात दलालांचे कमिशन ५१ टक्के असून २० टक्के बाजारशुल्क होते. एकीकडे फिनएन्फ्ल्युएन्सर दर दिवसाला ऑप्शन्स व्यवहारांतून एक टक्का लाभ मिळवा, असे भासवत असतानाच सेबीच्या अभ्यास अहवालात एक गोष्ट स्पष्ट झाली, ती म्हणजे एकूण गुंतवणूकदारांपैकी फक्त एक टक्काच वैयक्तिक गुंतवणूकदार फक्त एक लाख रुपयांहून अधिक नफा कमावू शकले आहेत. सेबीने अभ्यास केलेल्या मोठ्या पंधरा दलाल पेढ्यांच्या खात्यांमध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये नव्वद टक्के वैयक्तिक गुंतवणूकदार असून त्यापैकी ७५ टक्के लोकांनी राष्ट्रीय शेअर बाजारात फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये व्यवहार केल्याचे उघडकीस आले आहे. ऑप्शन्समध्ये व्यवहार करणाऱ्या छोट्या गुंतवणूकदारांची गेल्या तीन वर्षांतील उलाढाल एक लाख कोटी रुपयांहून अधिक होती आणि त्यांना झालेल्या निव्वळ तोट्याची रक्कम १००३ कोटी रुपये होती. ज्या गुंतवणूकदारांनी प्रत्येकी किमान एक कोटी रुपयांहून अधिक उलाढाल याच कालावधीत केली, त्यांचा एकत्रित तोटा १,४१,६४१ कोटी रुपये होता. वयाच्या पंचविशी-तिशीत असलेल्या युवा पिढीने या फ्युचर्स आणि ऑप्शन्सच्या व्यवहारात अधिक रस घेतल्याचे सिद्ध झाले आहे. आर्थिक वर्ष २३-२४मध्ये या तोट्यात गेलेल्या युवा गुंतवणूकदारांचे प्रमाण ९३ टक्के होते. अशाच व्यवहारात तोटा पदरात पडलेल्या वयाची साठी उलटलेल्या जेष्ठ नागरिकांचे प्रमाण ७९ टक्के होते. ज्या गुंतवणूकदारांचे वार्षिक उत्पन्न पाच लाख रुपयांहून कमी आहे अशा लोकांचे फ्युचर्स आणि ऑप्शन्स व्यवहारात तोटा झालेले प्रमाण ९२.२ टक्के आहे. स्त्री आणि पुरुष अशी गुंतवणूकदारांची वर्गवारी केली तर सरासरी प्रतिस्त्री गुंतवणूकदाराला ७५,९७३ रुपये तर प्रति पुरुष गुंतवणूकदाराला ८८,८०४ रुपये तोटा स्वीकारावा लागल्याचे सिद्ध झाले आहे.या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी स्वत:च्या लोभाला आणि अविवेकी कृतीला आवर घालण्याची वेळ आली आहे. आपल्या कष्टाच्या कमाईचे पैसे असे मातीमोल होणे कोणालाच परवडणारे नाही आणि त्याचे होणारे दूरगामी परिणाम गुंतवणूकदारांच्या कुटुंबव्यवस्थेवर होणार आहेत, याचा तरी गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. अशावेळी नियामक संस्था आणि सरकार यांना दूषणे देण्यापेक्षा स्वत:ला वेळीच सावरणे आवश्यक ठरणार आहे. चटकन श्रीमंत होण्यासाठी आपले भविष्य असे पणाला लावण्यापेक्षा म्युच्युअल फंड्स आणि निवडक शेअर्स खरेदीतून प्रदीर्घ टिकणाऱ्या संपत्ती निर्माणाचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे.

# शैक्षणिक संस्थांचे पळवाटांचे धूर्त धडे

सरकारी नियमांचे जोखड मानेवर बसू नये यासाठी पळवाटा कशा शोधायच्या, याचे धडे शिक्षण संस्था स्वतःच धूर्तपणे गिरवत असतात. गोरगरिबांना कोणतेही दाम न मोजता शिक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी विनाअनुदानित शाळांमध्येही राखीव जागा ठेवण्याची योजना आली. मात्र, त्यातून सुटका करून घेण्यासाठी शाळांनी आता अल्पसंख्याक दर्जाची ढाल पुढे केली आहे. मुंबईत अर्ध्याहून अधिक शाळांना अल्पसंख्याक दर्जा आहे. शेजारच्या ठाणे जिल्ह्यातही गेल्या चार वर्षात चारशे शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवून या आरटीई कायद्यातून सुटका करून घेतली आहे. धर्म, भाषा यांच्या आधारे शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा मिळतो. या संस्थांमधील प्रवेश त्याच अल्पसंख्याक श्रेणीतून भरले जातात का, हे कधीच बाहेर येत नाही. अल्पसंख्याक दर्जा म्हणजे आपल्याला हव्या त्या प्रकारे प्रवेश देण्याचे साधन म्हणून कित्येक संस्था वापरतात. महाविद्यालयीन स्तरावरही या दर्जाचा तसाच वापर आजवर होत आला आहे. मुळात सामाजिक न्यायाच्या सद्हेतूने अल्पसंख्याक दर्जा त्या संस्थेला देण्यात आला आहे. मग तोच सद्हेतू लक्षात घेऊन समाजातील वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचे भान या संस्थांनी दाखविणे अपेक्षित होते. त्यांनी ते केलेले नाही व राज्य सरकारनेही त्यांची ही पळवाट सहज स्वीकारून टाकली आहे.मराठी भाषेच्या अनिवार्यतेच्या मुद्द्यावरूनही आजवर या शाळांनी या ढालीचा वापर करून सरकारी सक्तीला वाटाण्याच्या अक्षताच लावल्या. विद्यार्थ्यांची फी असो, गणवेश किंवा काही चालीरीतींची सक्ती याबाबतीतही कॉन्व्हेंट शाळांनी कधीच कुणाला जुमानले नाही. काही वेळा तर सत्ताधीशांनी आम्ही या शाळांचे पाणी तोडू वगैरे पोकळ वल्गनाही केल्या होत्या. रग्गड फी भरून आपल्या पाल्यांना या शाळेत टाकणारे पालक तर हतबलच असतात. लग्नसमारंभांसाठी शाळेचे आवार देऊन या संस्था चांगले उत्पन्न कमावतात. मराठमोळ्या व जुन्याजाणत्या संस्थांना मात्र उत्पन्नाचे असे स्रोत तयार करताना नाकी नऊ येतात व सरकारी वजनकाट्यावर माप तोलत बसावे लागते. मराठीची जपणूक करणाऱ्या शैक्षणिक संस्था टिकाव्यात व नियमांमधून पळवाटा काढणाऱ्या संस्थांचे पितळ उघडे पडावे, यासाठी कोणत्याही सरकारांनी आजवर कधी अंकुश उगारलेला नाही. अर्ध्याअधिक संस्था जर सामाजिक जबाबदारीतून बादच होणार असतील, तर आर्थिक दुर्बलांना शैक्षणिक हक्क प्रदान करण्याचे ईप्सित साध्य तरी कसे होणार ?



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
वादळ वार्ता



## मनसेचे रमेश तात्या गालफाडे यांची प्रचारात आघाडी

# चेहरा नवा बदल हवा;केज मतदार संघात मतदाराचा उस्फुर्त प्रतिसाद

**केज । भालेराव सचिन**

केज विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांनी प्रचारात आघाडी घेतल्याने एकंदरीत चित्र दिसत आहे.

रमेश तात्या गालफडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी केज शहरासह मतदारसंघातील खेड्यापाड्यात जाऊन मतदारांच्या भेटीगाठी घेऊन मतदानाचे आव्हान करीत आहेत.तसेच आजपर्यंत केलेल्या कामासह पुढील काळात केज मतदार संघात विकासाचे व्हिजन काय असेल याबाबत मतदारांशी संवाद साधत आहेत. त्यांच्या या गावभेटीत दौऱ्याला गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून तालुक्यातील मुंदडा- साठे या प्रस्थापितांच्या भुलभुलैय्या कंटाळलेले मतदार आता चेहरा नवा,बदल हवा अशाप्रकारे बोलू लागल्याने



विरोधकांचे धाबे चांगलेच दणाणले असल्याचे चित्र दिसत आहे.

केज मतदारसंघात मुंदडा -साठे या प्रस्थापितांची सत्ता आतापर्यंत राहिलेली आहे.मात्र तालुक्यातील जनसामान्यांचे प्रश्न या प्रस्थापित मुंदडा - साठेना सोडवता न आल्याने मतदार संघातील जनतेत एक प्रकारे नाराजीचा सुर आहे. त्यातच यावेळी मुंदडा- साठे याना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांनी आव्हान उभे केल्याने निवडणुकीची रंगत वाढली असून याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. रमेश तात्या गालफाडे मागील काही वर्षात केज मतदार संघात राबविलेले विविध सामाजिक उपक्रम तसेच लोकांच्या अडीअडचणी दरम्यान मदतीसाठी धावून जाणारे नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रमेश तात्या गालफाडे यांना उमेदवारी दिली.त्यामुळे येथील मुंदडा - साठे या प्रस्थापितांना रमेश तात्या गालफाडे यांच्या उमेदवारीमुळे तडगे आव्हान उभे राहिले आहे. रमेश तात्या गालफाडे यांनी देखील यावेळी प्रस्थापितांना कोणत्याही परिस्थितीत मात द्यायची हा चंग मनाशी बांधून अगोदरच मतदारसंघातील गावोगावी दोन-तीन वेळा पोहचून तगडी यंत्रणा उभी केली आहे. त्यांचा प्रचार अगदी तळागाळात पोहचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी देखील कंबर कसल्याचे पाहायला मिळत आहे. रमेश तात्या गालफाडे यांच्यासह सर्व कार्यकर्ते मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे विचार व मतदारसंघातील पक्षाचा विकासनामा त्याचबरोबर निवडणूक चिन्ह रेल्वे इंजिन हे घराघरात पोहचवत आहेत.मतदारसंघातील गावागावांत जाऊन वैयक्तिक गाठीभेटी घेत आहेत.त्यामुळे केज मतदारसंघात रमेश तात्या गालफाडे यांच्यावर प्रेम करणाऱ्या मतदार व कार्यकत्यांमध्ये वेगळी ऊर्जा निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे.आपला नेता गतीने काम करत असल्याचे पाहून गावोगावी कार्यकर्ते देखील जोमाने प्रचार करत आहेत. या गाठीभेटी दौऱ्यामध्ये ठिकठिकाणी स्वतः उमेदवार रमेश तात्या गालफाडे सहभागी होताना दिसत आहेत.प्रामुख्याने गावागावांतील कार्यकर्ते तसेच मतदारांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता केज मतदार संघातील राजकीय वातावरण मनसेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना अत्यंत पोषक बनल्याचे बोलले जात आहे.

## उत्कृष्ट पेंटिंग छायाचित्रकार सृष्टीताई बळीराम वडजे यांच्या वतीने पत्रकार बांधवाना दिल्या दिपावलीच्या शुभेच्छा

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव शहरातील भाजपाच्या शहर अध्यक्ष्या सौ पल्लवी ताई बळीराम वडजे यांच्या ज्येष्ठकन्या तथा उत्कृष्ट पेंटिंग छायाचित्रकार सृष्टीताई बळीराम वडजे यांच्यावतीने पत्रकार बांधवांचा सन्मान करून त्यांना दीपावली फराळाचे वाटप केले सृष्टी ताई हे उत्कृष्ट पेंटिंग छायाचित्रकार असून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात गरुड झेप घेतली असून चित्रकला अभ्यासात ते पारंगत आहेत त्यांनी चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून इंटरमिजिएट





अनेक स्पर्धेमध्ये चित्रकलातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते आज दीपावली निमित्त सृष्टी ताईच्या वतीने पत्रकार बांधवांना दिवाळी फराळाचं वाटप करून पत्रकारांचा सन्मान करण्यात आला

## निवडणूक खर्चासाठी उमेदवाराचे स्वतंत्र बँक खाते आवश्यक

**जालना । असलम कुरेशी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता भारत निवडणूक आयोग यांनी खर्चविषयक सूचना सारसंग्रह २०२४ मध्ये निर्देश दिल्यानुसार उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडून त्यातूनच व्यवहार करणे आवश्यक आहे.

उमेदवारांने निवडणूक खर्चासाठी असलेली संपूर्ण रक्कम संबंधित बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. निवडणुकीसाठी उघडलेल्या बँक खात्यातून उमेदवाराने आपला निवडणूक खर्च धनादेश, धनाकर्ष, आरटीजीएस, एनईएफटीद्वारे करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी आपल्या विरोधात कोणतेही गुन्हे दाखल असल्याची,




नसल्याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. जाहिरातीचा खर्च निवडणूक खर्चाचीबाब म्हणून गणली जाईल.

## गोरगरिबांचा स्वाभिमान टिकविण्यासाठी बदामराव पंडितांना आमदार करणे गरजेच

### गुंतेगाव,पाथरवालातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**गेवराई । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या विजयासाठी गेवराई शहरासह ग्रामीण भागामध्ये कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले असतानाच भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अनेक कार्यकर्ते दररोज शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करत आहेत. गुंतेगाव आणि पाथरवाला येथील कार्यकर्त्यांनी बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केल्याने या भागांमध्ये ही त्यांची ताकद वाढल्याचे बोलले जात आहे.


गेवराई विधानसभा मतदारसंघात गेल्या ४० वर्षांपासून बदामराव पंडित यांनी विकासाच्या कामासह सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवण्यावर भर दिल्याने मतदारसंघातील गोरगरिब आणि सामान्य जनता ही आजही बदामराव पंडित यांच्यात पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे चित्र गेवराई शहरासह ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. सामान्यांचे प्रश्न सोडविण्याबाबत प्रामाणिकपणा आणि येईल त्याचे काम करण्याची वृत्ती यामुळे बदामराव पंडित यांच्या शिवसेने मध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर इनकमिंग होताना दिसत आहे. शिवसेना जिल्हा समन्वयक तथा बीड जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांच्या उपस्थितीत गुंतेगाव आणि पाथरवाला येथील मानव हित लोकशाही पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हिरामण खंदारे, गोरख खंदारे, सुमित खंदारे, अमोल खंदारे, महादेव लव्हे, दीपक शिंदे, रमेश पौळ, राजू आढागळे, जय लव्हे, रमेश पाटोळे आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेना जिल्हा समन्वयक तथा बीड जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते यशराज पंडित यांनी सर्वांचे गळ्यात भगवे रुमाल घालून शिवसेनेत स्वागत केले आहे. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रंगवली कला दर्शन उरण आणि लायन्स क्लब ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण मध्ये भव्य रांगोळी प्रदर्शन

### रांगोळी पाहण्यासाठी नागरिकांची मोठया प्रमाणात गर्दी-जनतेचा उत्तम प्रतिसाद

**उरण ।विठ्ठल ममताबादे**

दिपावली निमित्त रंगवली कलादर्शन उरण आणि लायन्स क्लब ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण शहरातील एन आय हायस्कूल येथे भव्य रांगोळीचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी १ तर संध्याकाळी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी सुरु आहे.रांगोळी प्रदर्शनाचे उदघाटन एन आय हायस्कूलचे चेअरमन सदानंद गायकवाड, लायन चंद्रकांत ठक्कर, संजीव अगरवाल यांच्या हस्ते शनिवार २/११/२०२४ रोजी झाले. सदर रांगोळी प्रदर्शन हे सर्व



नागरिकांना दिनांक ९/११/२०२४ पर्यंत सकाळी १० ते दुपारी १ तर संध्याकाळी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत विनामूल्य पाहता येणार आहे.थ्रीडी रांगोळी, व्यक्तीचित्र , निसर्गचित्र असे विविध प्रकाराचे रांगोळी काढण्यात आले आहेत.जेष्ठ कलाकार नंदकुमार साळवी यांच्या रांगोळी कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत त्यामुळे त्यांच्याही कलाकृतीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.रांगोळी कला बघण्यासाठी नागरिकांची मोठया प्रमाणात गर्दी होत आहे.नंदकुमार साळवी, दर्शन पाटील , सिद्धार्थ नागवेकर, नवनित पाटील, सत्या कडू, संतोष पाटील, राजेश नागवेकर, स्वप्नाली मणचेकर, ध्रुव म्हात्रे, वैष्णवी जाधव आदि कलाकारांनी उत्कृष्ठ असे रांगोळी काढून प्रेषकंची मने जिंकली आहेत. कलाकारांची कला जनते समोर यावी. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळावे. दिवाळी मध्ये नागरिकांना रांगोळी कलेचा आनंद लुटता यावा या दृष्टीकोनातून उरण मध्ये रांगोळी प्रदर्शन भरविण्यात आल्याचे सांगत जास्तीत जास्त नागरिकांनी हे रांगोळी प्रदर्शन आवर्जुन पहावे असे आवाहन नंदकुमार साळवी, राजेश नागवेकर यांच्यासह अन्य कलाकारांनी केले आहे.

## श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे आदिवासी बांधवाना दिवाळी फराळ वाटप

**उरण । विठ्ठल ममताबादे**

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार व कार्यांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सामाजिक बांधिलकी जपत आदिवासी बांधवांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. उरण तालुक्यातील चिरनेर येथील अक्कादेवी वाडी येथे आदिवासी बांधवांना फराळ वाटप करण्यात आले या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते माधव म्हात्रे,सामाजिक कार्यकर्ते कुमार ठाकूर तर अध्यक्षस्थानी बेलपाडाचे सामाजिक कार्यकर्ते महेश पाटील उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते दिवाळी फराळ वाटप करण्यात आले दिवाळीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेने फराळ वाटपाचा कार्यक्रम केला आहे. संस्था नेहमी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविते व सर्वांना मदतीचा हात देते असे गौरवोदगार यावेळी अध्यक्ष महेश पाटील यांनी सांगितले. संस्थेच्या कार्याविषयी शिक्षक सनी दिलीप बोरसे यांनी ओळख करून दिली. शेवटी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांनी उपस्थित सर्वांचे तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले.या सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक सनी बोरसे, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे , ओमकार म्हात्रे, प्रेम म्हात्रे, कुमार ठाकूर ,भाविक पाटील, सुविधा म्हात्रे, शुभम ठाकूर, माधव म्हात्रे, सानिका म्हात्रे, मुकेश म्हात्रे, समीर पाटील, प्रकाश म्हात्रे आदींनी विशेष मेहनत घेतली.

# विधानसभा निवडणूकीत प्रचारासाठी सोशल मिडियाचा हायटेक फंडा

**जालना । असलम कुरेशी**

विधानसभा निवडणुकीत सोशल मिडियाचा हायटेक फंडा वाढल्याचे दिसून येत असून निवडणूकीत सोशल मिडिया राजकीय पक्षांसाठी आधुनिक प्रचारदूत ठरत असल्याचे दिसून येत आहे.

विधानसभा निवडणूकीत फोटो, व्यंगचित्र, व्हिडीओच्या माध्यमातून प्रचार केला जात असून पुढील काही दिवसांत पदयात्रा, मतदारांशी वैयक्तिक संपर्क, चौक सभा वाढण्याची शक्यता आहे. पूर्वी प्रचारासाठी कार्यकर्ते प्रत्येक गावात जाऊन प्रचार करीत होते. मात्र माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात फेसबुक, व्हॉट्सप, ट्विटर, इन्स्टाग्राम यासारख्या माध्यमांतून विधानसभेच्या उमेदवारांचे समर्थक पोस्ट टाकत आहेत. सोशल मिडिया म्हणजे प्रत्येक पक्षाच्या उमेदवारासाठी प्रचारदूतच बनला आहे. विधानसभा निवडणुकीत सोशल मीडियाचा हायटेक फंडा प्रभाव पडणार आहे. घनसावंगी विधानसभा मतदार संघ हा ग्रामीण तथा दुर्गम भाग जरी असला तरी इंटरनेटमुळे जगातील सर्व



हालचाली ज्ञात होत आहेत. या सगळ्यांत आपुलकीचा विषय ठरत असलेले माध्यम म्हणजे सोशल मिडियावर रमणे अगत्याचे झाले असल्याने, विधानसभा निवडणुकीदरम्यान अनेक राजकीय नेते जागतिक क्रांती ठरलेल्या इंटरनेटवरील सोशल मिडियाचा वापर हा आधुनिक प्रचारदूत या भावनेने करीत आहे, यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद देखील मिळू लागला आहे.

पदयात्रा, मतदारांशी वैयक्तिक संपर्क, चौक सभा यांचे महत्त्व आजसुद्धा कमी झालेले नाही. तथापि फेसबुक, व्हॉट्सप, ट्विटर, इन्स्टाग्राम यासारख्या माध्यमांतून विधानसभेच्या उमेदवारांचे समर्थक पोस्ट टाकत आहेत. सोशल मिडिया म्हणजे प्रत्येक पक्षाच्या उमेदवारासाठी प्रचारदूतच बनला आहे. विधानसभा निवडणुकीत सोशल मिडियाचा प्रभाव पडणार आहे. म्हणूनच निवडणूक आयोगानेही यावर नजर ठेवण्याची गरज आहे. राजकीय पक्षांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या पोस्ट टाकण्याचा सपाटा लावला आहे. मतदारांवर सोशल मिडियाच्या माध्यमातून एकतर्फी भडिमार होऊ शकतो. सोशल मिडियाचा योग्य उमदेवाराची निवड करताना उपयोग होऊ शकतो. यासाठी सोशल मिडियाला एक व्यासपीठ बनवता येईल, शिवाय, लोकशाहीच्या मंदिरात स्वच्छ प्रतिमा असलेले उमेदवार या माध्यमातून आपली दावेदारी सादर करू शकतात.

आज सोशल मीडिया राजकीय पक्षासाठी एक नवे साधन म्हणून पुढे आले आहे. घनसावंगी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा विचार करता सोशल मीडियावर राजकीय पक्षाची सक्रियता बघायला मिळत आहे. मतदान जवळ आल्यानंतर सोशल मीडियावरील प्रचाराचा भडीमार अधिक वाढणार आहे. कार्यकर्ते विविध प्रकारचे फोटो, व्यंगचित्र, व्हिडीओच्या माध्यमातून प्रचार करीत आहेत. सोशल मीडियावरील राजकीय पोस्टवर नजर ठेवणे अवघड आहे. त्यामुळे मतदारांत संभ्रम वाढण्याची शक्यता आहे. अनेकांनी राजकीय पोस्ट टाकणाऱ्यांना आपल्या व्हाटस अप ग्रुपमधून रिमूव्ह करणे सुरू केले आहे.

**थेट मतदारांशी संपर्काचे साधन!**

निडणुकीच्या कालावधीत सोशल मीडियावर प्रत्येक तिसरा मेसेस हा राजकीय पक्ष, कार्यकर्ते यांच्याशी निगडित आहे. २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत पारंपरिक प्रचार जवळपास लुप्त झाल्याचे दिसून येत आहे. त्याची जागा पूर्णपणे सोशल मिडियाने घेतली आहे. प्रत्येक इच्छुक उमेदवाराने आपापले सोशल मिडिया सेल वर्षभर आधीपासूनच कार्यान्वित केले. थेट मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठीचा पर्याय म्हणून सगळ्याच राजकीय पक्षांनी याचा पुरेपूर वापर करायला सुरुवात केली आहे. ही सगळी आधुनिक तंत्रज्ञानाची कमाल आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीतही तसेच चित्र दिसत आहे. त्यामुळे उत्तरोत्तर हायटेक प्रचाराचा फंडा वाढत जाईल, यात शंका नाही.

# आम्ही तिन्ही पक्ष लढू, जिंकू आणि महाराष्ट्रावर महायुतीचा झेंडा फडकवू-भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकरांना विश्वास

**मुंबई। (वृत्तसंस्था)**

काल मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि तिन्ही पक्षाचे प्रमुख नेते यांची बैठक झाली. दोन-तीन अपवाद वगळले तर सर्व ठिकाणची बंडखोरी क्षमतेय. ४ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा आहे. आम्ही तिन्ही पक्ष लढू, जिंकू आणि महाराष्ट्रावर महायुतीचा झेंडा फडकवू, असा विश्वास भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकरांनी व्यक्त केला. आज दिवाळीच्या पहिल्या दिवशी भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडिंवर भाष्य केले.

काँग्रेसचे रवी राजा यांच्या भाजपा प्रवेशावर दरेकर म्हणाले की, रवी राजा हे केवळ काँग्रेसचे कार्यकर्ते किंवा नेते नाहीत. तर एक अभ्यासू अशा प्रकारचे विरोधी पक्षनेता म्हणून मुंबईकरांच्या प्रश्नावर मुंबई महापालिकेत त्यांची कारकीर्द गाजली आहे. लोकाभिमुख अशा प्रकारचे व्यक्तिमत्व आहे. कोणीतरी आले एवढ्या पुरता हा विषय सिमीत नसून एक विरोधी पक्षनेता आज काँग्रेसमधून भाजपात येतो हे प्रतिबिंब कशाचे आहे हे काँग्रेसने समजून घेण्याची गरज आहे. विरोधी पक्षनेत्यालाच आपल्या पक्षावर विश्वास नाही, भाजपावर विश्वास निर्माण होतो यावरून काँग्रेसमध्ये अनेक अशी लोकं आहेत जी भाजपाचे, महायुतीचे काम करणार आहेत आणि सरकार आणणार आहेत. आता विजय वडेट्टीवार येऊ नये. त्यांचीही काँग्रेसमध्ये घुसमट होतेय. मनोज जरांगे पाटील यांच्या विधानावर बोलताना दरेकर म्हणाले की, जरांगेंनी सगळ्याच जागा लढवल्या पाहिजेत. त्यांचा हेतू पाडापाडीचा असेल तर त्याला मराठा समाज, मतदार दाद देणार नाही. लोकांना सकारात्मक राजकारण पाहिजेय. मराठा समाजाचे उमेदवार पाडायचे दुसऱ्या बाजूने ओबीसीतून आरक्षण द्या बोलायचे, इम्तियाज जलील यांना मिठ्या मारायच्या, हे मराठा समाजाला आवडत नाही. त्यांनी लढावे, जिंकावे यासाठी आमच्या शुभेच्छा असल्याचेही दरेकर म्हणाले.

तसेच जरांगे केवळ आता मराठा समाजाचा चेहरा होऊ पाहत नाही. मराठा समाजाने त्यांना नाव, लौकिक, चेहरा दिला. परंतु त्यांच्यात राजकारणाचे वारं भिनलेय, असे टिकास्त्र भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी सोडले आहे. तसेच जरांगे पाटील यांच्या भुमिका मराठा समाजासाठी ज्या पहिल्या होत्या त्या आता राहिलेल्या नाहीत. मराठा समाज ताकदीने महायुतीच्या मागे उभा राहील. निकालातून ते दिसून येईल, असा ठाम विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला. सर्व पक्षांना, सर्व जातीधर्मांना बरोबर घेऊन एक निधर्मवादी असा नेता म्हणून त्यांची छबी पुढे आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. जरांगेंनी आता समाजाच्या गोष्टी करू नयेत, राजकारण करावे आणि राजकीय पक्ष असतात तसे काम करावे, असा टोलाही लगावला.



### गोपाळ शेट्टीनी पक्षासोबत राहावे

**दरेकर म्हणाले की, गोपाळ शेट्टी हे पक्षाला मानणारे, पक्षाची विचारधारा मानणारे अशा प्रकारचे नेते आहेत. लोकांमध्ये काम करणारे आहेत. आम्हाला पूर्ण विश्वास आहे ते पक्षासोबत राहतील. ४ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा आहे. पक्षाने त्यांना खूप दिले आहे. नगरसेवक, आमदार, खासदार झाले. अशा वेळी त्यांनी पक्षासोबत राहावे, अशी अपेक्षा असल्याचेही दरेकरांनी म्हटले. नवाब मलिक यांच्यावर बोलताना दरेकर म्हणाले की, यासंदर्भात भाजपने स्पष्ट भुमिका अनेकदा सांगितली आहे. फडणवीस, शेलार यांनी मांडलेली भुमिका तीच आमचीही भुमिका आहे. नवाब मलिक यांनी काय करावे हा त्यांचा विषय आहे.**

### ...तर आम्हीही सहन करणार नाही

**दरेकर म्हणाले की, देवेंद्र फडणवीस एक संयमी नेते आहेत. राज्याचे लोकप्रिय, समंज्यस अशा प्रकारचे नेतृत्व आहे. जरांगेंना सांगितलेय व्यक्तिशः टार्गेट कुणाला, पक्षाला करू नका. तुम्ही समाजाची चळवळ चालवा आम्ही सोबत आहोत. परंतु व्यक्तिगत पक्षावर आणि फडणवीसांवर याल तर आम्हीही सहन करणार नाही, असा इशाराही दरेकरांनी जरांगे यांना दिला.**

# उरुळी कांचन, शिंदवणे व टिळेकरवाडी येथील अवैध हातभट्टींवर पोलिसांचे छापे

## ४५०० लिटर दारू,कच्चे रसायनासह ३ लाखाचा मुद्देमाल जप्त

**पुणे। प्रतिनिधी**

उरुळी कांचन, शिंदवणे आणि टिळेकरवाडी येथील अवैध हातभट्टींवर उरुळी कांचन पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने बुधवारी (ता. ३०) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास छापे टाकले.

या कारवाईत पोलिसांनी ४५०० लिटर कच्चे रसायन व दारू असा ३ लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच दिवशी छापे टाकले, ज्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. गुन्हा दाखल झालेल्या आरोपींमध्ये शायना क्रिश राठोड (वय-१९, रा. काळेशिवार, शिंदवणे), राजेश लोंढे (रा. पांढरस्थळ, उरुळी कांचन) आणि परलोक रजपूत (रा. गोळीबार मैदान, उरुळी कांचन) यांचा समावेश आहे. पहिल्या घटनेत, शिंदवणे ग्रामपंचायत हद्दीतील काळेशिवार परिसरात एक महिला गावठी हातभट्टी दारू तयार करीत होती. पोलिसांनी छापात ३५० लिटर रसायन व ३५ लिटर दारू व सरपण असा १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



दुसऱ्या घटनेत, उरुळी कांचन ते डाळींब रोडवरील पांढरस्थळ परिसरात राजेश लोंढे हा गावठी दारू बनवीत असताना आढळला. मात्र त्याला पोलीस आल्याची चाहुल लागताच तो झाडाझुडपातुन पळाला. या कारवाईत १६०० लिटर कच्चे रसायन व ३८५ लिटर गावठी हातभट्टी दारू असा ८४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तिसऱ्या घटनेत, टिळेकरवाडीतील भवरापूर व टिळेकरवाडीच्या वेशीच्या ओढयालगत अवैध दारू तयार केली जात होती. या छाप्यात पोलिसांनी २००० लिटर कच्चे रसायन व १७५ लिटर गावठी हातभट्टी दारू असा एकूण ८९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात एका महिलेसह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पोलिसांचे नागरिकांकडून भरभरून कौतुक होत आहे. या कारवाईने अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

अवैध दारू विक्री करणाऱ्या दोघांवरही कारवाई करण्यात आली. नायगाव येथे विदेशी दारू विक्री करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आणि २७८० रुपयांची विदेशी दारू जप्त केली. अशा प्रकारच्या कार्यवाहीमुळे नागरिकांमध्ये सुरक्षा भावना वाढली आहे आणि पोलिसांच्या कार्याची प्रशंसा होत आहे.

# उल्हानगरमध्ये मोठं घबाड; संशयित कारवर भरारी पथकाचा छापा

**ठाणे। प्रतिनिधी**

दिवाळीच्या धूमधडाक्यात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय गडबड सुरू आहे. निवडणूक आयोगाने राज्यात भरारी पथके तैनात केली असून, पोलीस यंत्रणा देखील सज्ज आहे.

अलीकडेच पुणे जिल्ह्यातील खेड शिवापूर येथे पोलिसांनी एक कार जप्त केली होती, ज्यामध्ये तब्बल ५ कोटी रुपयांची रोकड आढळून आली होती. यानंतर, पुण्यात सोन्याच्या दागिन्यांची वाहतूक करणारा टेम्पोही पोलिसांनी ताब्यात घेतला. बुधवारी पालघरमध्ये ५ कोटींची रोकड जप्त झाल्यानंतर आता उल्हासनगरमध्येही एका कारमध्ये मोठी रोकड पोलिसांनी जप्त केली आहे. उल्हासनगर विधानसभा १४१ मतदारसंघात मुरबाडच्या दिशेने जाणाऱ्या एका कारमधून १७ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. निवडणूक भरारी पथकांनी रात्री दोनच्या सुमारास कल्याणकडून मुरबाडकडे जाणारी कार संशयास्पद आढळून आल्याने तिची तपासणी केली. तपासणीदरम्यान रोख रक्कम आढळून आल्याने भरारी पथकाने ती जप्त केली. या रकमेचे नोंदणी कार्यवाहीसाठी पोलिसांनी कोषागार विभागात जमा केले आहे. तसेच, आयकर विभागाला तत्काळ माहिती देण्यात आली आहे. २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज आणि मौल्यवान धातूंसह १५ ते ३० ऑक्टोबर २०२४ दरम्यान एकूण १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत सजगपणे कार्यरत असलेल्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी या यशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पोलीस विभागाने सुमारे ७५ कोटी रुपये, आयकर विभागाने सुमारे ६० कोटी रुपये आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुमारे ११ कोटी रुपयांच्या बेकायदा मालमत्तेवर कारवाई केली आहे. मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी-व्हिजील' पवर तक्रार करण्यास प्रोत्साहित करण्यात आले आहे. या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.

## राज ठाकरे यांनी व्यापक हिंदुत्वाची भूमिका स्वीकारली

# देवेंद्र फडणवीसांचे मत, भाजपमधील बंडखोरी शमवण्याचाही केला दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)–निवडणुकीतील बंडखोरांचे बंड शमवण्यासाठी पक्षांकडून प्रयत्न सुरू आहेत. महायुतीच्या काही मतदारसंघातही बंडखोरी झाली असून आम्ही त्यांच्याशी चर्चा करत आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवसापर्यंत महायुतीच्या जागांवर दाखल झालेले क्रॉस फॉर्म मागे घेतलेले असतील, असेही फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी राज ठाकरे यांनी व्यापक हिंदुत्वाची भूमिका घेतली, असेही म्हटले.देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, नामांकनानंतर काही ठिकाण क्रॉसफॉर्म आले होते. त्यासंदर्भात काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरी आम्ही सर्वांची बैठक झाली. जवळपास सर्व अडचणी आम्ही संपवल्या आहेत. जे परत घेतले पाहिजे असे क्रॉसफॉर्म परत घेतले जातील. काही ठिकाणी एकमेकांच्या उमेदवारांसमोर क्रॉस बंडखोरी झाली आहे. त्यासंदर्भात निती तयार केली असून तिकिट नसताना उमेदवारी भरणाऱ्यांशी चर्चा करत आहोत. त्यांना माघार घ्यावी यासाठी तिन्ही पक्षांचा प्रयत्न आहे. काही ठिकाणी पक्षांतर्गत आमचे कार्यकर्ते उभे राहिले आहेत. त्यांना विश्वास घेऊन चर्चा करुन त्यांनी माघार घ्यावी, यासाठी आमचे प्रयत्न सुरू असल्याचे फडणवीस म्हणाले.**



### राज्यात भाजपचा नाही तर महायुतीचा मुख्यमंत्री

**मी राज ठाकरेंचा आभारी आहे. त्यांच्या शुभेच्छा नम्रपणे स्वीकारतो. पण महाराष्ट्रात भाजपचे सरकार येणार नसून महायुतीचे सरकार येणार आहे आणि महायुतीचाच मुख्यमंत्री असेल, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.**

गोपाळ शेट्टी भाजपचे प्रामाणिक कार्यकर्ता राहिलेले आहेत. ते अनेकवेळा आग्रही असतात, पण ते पक्षशिस्तही मान्य करतात. गोपाळ शेट्टी यांना सगळी परिस्थिती समजावून सांगू. तसेच त्यांनी नेहमीप्रमाणे भाजपच्या मागे राहण्याची भूमिका घ्यावी, यासाठी आमचा प्रयत्न असेल, असे फडणवीस म्हणाले.राज ठाकरे भाजपाला उघडपणे पाठिंबा देत आहेत. त्यामुळे उत्तर भारतीयांचे मत भाजपापासून दूर जाईल का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, याबद्दल मी लोकसभेलाच बोललो आहे. राज ठाकरे यांनी व्यापक हिंदुत्वाची भूमिका घेतलेली आहे. क्षेत्रीय अस्मितेला भाजपचे नेहमीच समर्थन राहिले आहे. राष्ट्रीय अस्मितेचा स्वीकार होणे महत्त्वाचे असते. ती राष्ट्रीय अस्मिता म्हणजेच हिंदुत्व हे राज ठाकरेंनी स्वीकारले आहे, असे फडणवीस म्हणाले.अमित ठाकरे यांना पाठिंबा देण्याबाबत आमची सगळी बोलणी सुरू आहे. राज ठाकरे, एकनाथ शिंदे, आशिष शेलार आमची चर्चा सुरू असून सगळे एकत्र राहून मार्ग निघाला पाहिजे, असा आमचा प्रयत्न सुरू असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077